सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - ११३ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. १२ जून २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४


## पंतप्रधान मोदींच्या १२ वर्षांच्या नेतृत्वात भारताचे सर्वांगीण परिवर्तन – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२मुंबई –** पंतप्रधाननरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र शासनाने गेल्या १२ वर्षांत देशाच्या विकासाला अभूतपूर्व गती दिली आहे. गेल्या १२ वर्षात भारताची जागतिक पातळीवरील प्रतिष्ठा उंचावण्यासह आर्थिक, सामाजिक, पायाभूत आणि सांस्कृतिक क्षेत्रांत व्यापक परिवर्तन घडवून आणले असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र शासनाच्या १२ वर्षपूर्ती निमित्त आयोजित पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. भाजपा प्रदेशाध्यक्ष आ. रविंद्र चव्हाण, मुं १बई अध्यक्ष आ. अमित साटम, प्रदेश सरचिटणीस आ. निरंजन डावखरे, प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन आदी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पंतप्रधान मोदी यांनी सलग ४३९८ पेक्षा अधिक दिवस देशाचे नेतृत्व करत सर्वाधिक काळ कार्यरत राहिलेले निर्वाचित पंतप्रधान म्हणून नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली गेल्या १२ वर्षांत भारताने विविध क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती साधली आहे. सुमारे २५ कोटी नागरिकांना गरिबीरेषेबाहेर काढण्यात यश आले आहे. ८१ कोटी नागरिकांना मोफत अन्नधान्याचा लाभ देण्यात आला



आहे. महिला सक्षमीकरणासाठी जनधन योजना, उज्ज्वला योजना, सुकन्या समृद्धी योजना, लखपती दीदी अभियान आणि जलजीवन मिशनसारख्या उपक्रमांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. देशातील ३ कोटी महिला लखपती दीदी बनल्या असून महाराष्ट्रात हा आकडा ५० लाखांपर्यंत पोहोचला आहे. सुशासनाच्या क्षेत्रात डिजिटल तंत्रज्ञानाचा व्यापक वापर करून थेट लाभ हस्तांतरण योजनेद्वारे नागरिकांच्या खात्यात लाखो कोटी रुपये जमा करण्यात आले; तसेच जेम पोर्टल आणि डिजिटल व्यवहार प्रणालीमुळे प्रशासन अधिक पारदर्शक आणि कार्यक्षम बनले असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, जागतिकदृष्ट्या विचार केल्यास, भारत जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनली आहे. देशाचा विकासदर सात टक्क्यांपेक्षा अधिक राहिला आहे. यूपीआयच्या माध्यमातून डिजिटल व्यवहारांमध्ये भारताने जागतिक नेतृत्व मिळवले आहे. उत्पादन आधारित प्रोत्साहन, मेक इन इंडिया आणि सेमीकंडक्टर प्रकल्पांमुळे रोजगारनिर्मितीला चालना मिळाली आहे. महाराष्ट्राच्या विकासासाठी केंद्र शासनाने विशेष सहकार्य केले असून अटल सेतू, मुंबई कोस्टल रोड, मेट्रो प्रकल्प, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, वाढवण बंदर, दिघी पोर्ट, अमरावती मेगा टेक्स्टाइल पार्क, छत्रपती संभाजीनगर येथील डीएमआयसी आणि औरिक सिटी, गडचिरोली स्टील सिटी; तसेच रायगड येथील एम्ससारखे महत्त्वाचे प्रकल्प राज्यात साकार होत असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

## बनावट तंबाखू बनवणाऱ्या कारखान्यावर मध्यरात्री छापा

### ११.३१ लाखांचा मुद्देमाल जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२चंद्रपूर**
सावली तालुक्यातील रयतवारी येथे बनावट तंबाखूची निर्मिती व विक्री करणाऱ्या कारखान्यावर स्थानिक गुन्हे शाखा (एलसीबी), सावली पोलीस आणि अन्न सुरक्षा विभागाने संयुक्त छापा टाकला. या कारवाईत एकूण ११ लाख ३१ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, रयतवारी येथील विजय भीमाजी भांडेकर (वय ३३, रा. सामदा बु., ता. सावली) हा महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या सुगंधित तंबाखूचा साठा करून मशीनच्या साहाय्याने बनावट तंबाखू तयार करीत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखा, सावली पोलीस आणि अन्न सुरक्षा विभागाच्या संयुक्त पथकाने ११ जून २०२६ रोजी संबंधित ठिकाणी धाड टाकली.

**११ लाख ३१ हजार ४०० रुपयांचा माल जप्त**

या कारवाईदरम्यान पथकाने घटनास्थळावरून 'होला' व 'ईगल' ब्रँडचा हुक्का शिशा तंबाखू, खुला सुगंधित तंबाखू, तंबाखू पॅकिंगसाठी लागणारे साहित्य, उत्पादन व पॅकिंगसाठी वापरण्यात येणारी यंत्रसामग्री तसेच (एमएच-३४-सीजे-९६२५) क्रमांकाचे वाहन जप्त केले. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत ११ लाख ३१ हजार ४०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

चौकशी दरम्यान आरोपी विजय भांडेकर याने हा कच्चा माल आणि इतर साहित्य विनय गुप्ता (रा. गोकुळनगर, गडचिरोली) याच्याकडून खरेदी केल्याची कबुली दिली. जप्त साहित्यावरून आरोपी मोठ्या प्रमाणावर बनावट तंबाखूचे उत्पादन, पॅकिंग आणि बेकायदेशीर विक्री करीत असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे.या प्रकरणी प्रतिबंधात्मक आदेशांचे उल्लंघन करून मानवी आरोग्यास अपायकारक ठरणाऱ्या सुगंधित तंबाखूचे उत्पादन, साठवणूक,



वाहतूक आणि विक्री केल्याप्रकरणी आरोपींविरुद्ध अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ तसेच भारतीय न्याय संहिता (बीएनएस) अंतर्गत विविध कलमान्वये सावली पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास सावली पोलीस करीत आहेत.

## राज्यसभा निवडणुकीपूर्वीच

## भाजपाप्रणित NDA चा 'बंपर' विजय; ताकद वाढली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२नवी दिल्ली –**
राज्यसभा निवडणुकीपूर्वीच भाजपाप्रणित छऊ- बंपर विजय मिळवला आहे. आघाडीचे १५ हून अधिक उमेदवार बिनविरोध निवडले आहेत. भाजपाला मध्य प्रदेशातील तिन्ही जागांवर विजय मिळाला आहे. दुसरीकडे काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्यासह विरोधी पक्षाचे नेतेही बिनविरोध जिंकलेत. उर्वरित जागांवर १८ जून रोजी मतदान पार पडणार आहे.



झारखंडच्या २ जागांवर तगडी फाईट पाहायला मिळण्याची शक्यता आहे. मिझोराम येथील एका जागेवरही १८ जूनला मतदान होईल. १० राज्यांमधील २४ जागांसाठी तर महाराष्ट्र, ओडिशा आणि तामिळनाडूत प्रत्येकी एका जागेवर पोटनिवडणूक पार पडत आहे. बिनविरोध निवड झालेल्या सर्व उमेदवारांना संबधित निवडणूक अधिकाऱ्यांकडून विजयाचे प्रमाणपत्र मिळाले आहे. झारखंडमध्ये राज्यसभेच्या २ जागांसाठी ३ उमेदवार रिंगणात आहेत. त्यात झारखंड मुक्ती मोर्चाचे बैघनाथ राम, काँग्रेसचे प्रणव झा आणि अपक्ष उमेदवार परिमल नाथवानी यांचा समावेश आहे. नाथवानी रिलायन्स इंडस्ट्रीजचे संचालक आहेत आणि त्यांना भाजपाने पाठिंबा दिला आहे. झारखंड विधानसभेत इंडिया आघाडीकडे ५६ आमदार आहेत. याठिकाणी विजयासाठी प्रत्येक उमेदवाराला २८ मतांची गरज आहे. भाजपाकडे २१ आमदारांचे संख्याबळ आहे. मिझोराममधील एकमेव राज्यसभेच्या जागेसाठी सत्ताधारी झोराम पीपल्स मुव्हमेंट (जेपीएम) चे प्रवक्ते के. लालतलुआंगकिमा आणि प्रमुख विरोधी पक्ष मिझो नॅशनल फ्रंट (एमएनएफ) चे झोथनसंगी हमार हे रिंगणात आहेत.


मध्य प्रदेशातील राज्यसभेच्या द्विवार्षिक निवडणुकीत भाजपाचे तीन उमेदवार तरुण चुघ, रजनीश अग्रवाल आणि महेश केवट यांना रिटर्निंग ऑफिसरने बिनविरोध निवडून आल्याचे घोषित केले. मध्य प्रदेशात काँग्रेसच्या राज्यसभेच्या उमेदवार मिनाक्षी नटराजन यांचा उमेदवारी अर्ज बाद झाल्याने भाजपा उमेदवारांच्या बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला. भाजपा उमेदवार महेश केवट यांनी निवडणूक अधिकाऱ्यांकडे तक्रार करत मिनाक्षी नटराजन यांनी तेलंगणातील एका खटल्याचा उल्लेख प्रतिज्ञापत्रात केला नाही अशी तक्रार केली. या प्रकरणात दोन्ही बाजू ऐकल्यानंतर निवडणूक अधिकाऱ्यांनी नटराजन यांचा अर्ज बाद करण्याचा निर्णय घेतला.

कर्नाटकातून काँग्रेस अध्यक्ष खरगे यांच्यासह चार उमेदवार राज्यसभेवर बिनविरोध निवडून आले आहेत. त्यापैकी एक भाजपाचे उमेदवार आहेत. खरगे यांच्या व्यतिरिक्त इतर नवनिर्वाचित सदस्यांमध्ये काँग्रेस सचिव मन्सूर अली खान, खेडा आणि भाजपाचे एम. नागराज यांचा समावेश आहे. राज्यातील चार विद्यमान राज्यसभा सदस्य भाजपाचे इरन्ना कडडी आणि नारायण कोरगप्पा, काँग्रेसचे मल्लिकार्जुन खरगे आणि जनता दल (सेक्युलर) नेते एच. डी. देवेगौडा – यांचा कार्यकाळ २५ जून रोजी संपत असून या रिक्त जागा भरण्यासाठी निवडणुका जाहीर करण्यात आल्या होत्या.

## महाराष्ट्रातील १२ लोकसभा मतदार संघांचे प्रत्येकी तीन भागात विभाजन होणार?

### पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेचा प्रस्ताव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२मुंबई** नुकत्याच पार पडलेल्या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांच्या निकालांनी देशाच्या राजकारणाला पूर्णपणे नवीन दिशा दिली आहे. या निवडणुकांमधील घवघवीत यशामुळे केंद्रातील सत्ताधारी भाजपचे मनोधैर्य कमालीचे वाढले आहे. याच कारणामुळे, गेल्या एप्रिल महिन्यात संसदेत मंजूर होऊ न शकलेले बहुप्रतिक्षित 'परिसीमन विधेयक' मोदी सरकार पुन्हा एकदा संसदेत आणण्याच्या तयारीत आहे. या दरम्यान, पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेने देशातील लोकसभा जागांच्या विस्ताराचा एक अत्यंत महत्त्वाचा सांख्यिकीय आराखडा सादर केला आहे, ज्यामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.या नव्या प्रस्तावानुसार, देशातील एकूण लोकसभा जागांची संख्या सध्याच्या





५४३ वरून थेट ८२४ पर्यंत वाढवण्याची शिफारस करण्यात आली आहे. यानुसार महाराष्ट्रातील १२ मोठे मतदारसंघ प्रत्येकी तीन मतदारसंघांत विभाजित केले जाणार आहेत. यामुळे महाराष्ट्रातील लोकसभा मतदारसंघ २४ ने वाढणार आहेत. पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेच्या सदस्य शमिका रवी आणि इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूटचे सदस्य मुदित कपूर यांनी या परिसीमनावर एक 'वर्किंग पेपर' तयार केला आहे. त्यानुसार, लोकसभा जागा ८२४ करण्यासाठी देशातील सर्वच्या सर्व ५४३ मतदारसंघांची पुनर्रचना करण्याची गरज नाही. त्याऐवजी, देशातील केवळ १७० सर्वात मोठ्या लोकसभा मतदारसंघांचे तुकडे (विभाजन) करण्याचा महत्त्वाचा सल्ला देण्यात आला आहे.५९ जागांचे दोन भागात विभाजन: १७० पैकी ५९ मतदारसंघांचे प्रत्येकी दोन नवीन लोकसभा जागांमध्ये रूपांतर केले जाईल.१११ जागांचे तीन भागात विभाजन: उर्वरित १११ मोठ्या मतदारसंघांचे प्रत्येकी तीन-तीन लोकसभा भागांमध्ये विभाजन केले जाईल.या नवीन मॉडेलमुळे महिलांसाठी ३३% आरक्षण लागू करणे अधिक सुलभ होईल. तसेच, यामुळे २०२९ च्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये मतदानाचा टक्का ०.३ ते २.३ टक्क्यांनी वाढू शकतो, म्हणजेच सुमारे ९० लाख ते २.३ कोटी नवीन मतदार वाढतील, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

## 'काँग्रेस' हा भाजपाला आव्हान देणारा एकमेव पक्ष

### काँग्रेसमुक्त करायला निघालेलेच झाले काँग्रेसयुक्त', हर्षवर्धन सपकाळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२मुंबई –** काँग्रेस पक्ष या देशाची आशा आहे,. काँग्रेस पक्ष या देशाचा डीएनए आहे आणि भाजपाला फक्त काँग्रेस पक्षच आव्हान देऊ शकतो. आणि २०१४ मध्ये जे काँग्रेसमुक्त भारत करण्याचा वल्गना करत होते, त्यांचा पक्षच आज काँग्रेसयुक्त झाला आहे, असा टोला काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्षन सपकाळ यांनी लगावला.

टिळक भवन येथे प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी काँग्रेस डुबतं जहाज आहे या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विधानाला प्रत्युत्तर दिले ते म्हणाले की, काँग्रेस पक्ष या देशाची आशा आहे,. काँग्रेस पक्ष या देशाचा डीएनए आहे आणि भाजपाला फक्त काँग्रेस पक्षच आव्हान देऊ शकतो. आणि २०१४ मध्ये जे काँग्रेसमुक्त भारत करण्याचा वल्गना करत होते, त्यांचा पक्षच आज काँग्रेसयुक्त झाला आहे. फडणविसांनी त्यांच्या



आजूबाजूला पाहिले तर काँग्रेसचेच लोक दिसतील. भाजपा मात्र मित्रपक्ष गिळणारी 'चेटकीण' आहे, असा टोलाही सपकाळ यांनी लगावला.

यावेळी हर्षवर्धन सपकाळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विधानांचाही समाचार घेतला. ते पुढे म्हणाले की, स्वामीनाथन समितीची स्थापना काँग्रेसप्रणित यूपीए सरकारच्या (२००४-२०१४) वेळी करण्यात आली होती व त्याचा अहवालही त्यावेळी प्राप्त झाला होता पण त्याची अंमलबजावणी करण्याआधीच केंद्रात सत्ताबदल झाला व नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजपाचे सरकार आले. या मोदी सरकारने स्वामीनाथन आयोग गुंडाळून ठेवला पण मोदी सरकारने त्याची अंमलबजावणी केली असे देवेंद्र फडणवीस धादांत खोटे सांगत आहेत. शेतकऱ्यांच्या कांदा, सोयाबीन, कापूस, तूर, हरभरा अशा कोणत्याही शेतमालाला हमीभाव मिळत नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वामीनाथन समितीचा अहवाल तरी वाचलेला आहे की नाही आणि अण्णा हजारे तर यावरही गप्पच आहेत. भाजपा व देवेंद्र फडणवीस मोदी सरकारच्या १२ वर्षांच्या कामाचा ढोल बडवत आहेत तर या १२ वर्षात मोदी सरकारने नेमके काय केले याची श्वेतपत्रिका काढून वस्तुस्थिती मांडावी. किती बांग्लादेशी, रोहिंग्यांना परत पाठवले हेही पंतप्रधानांनी पत्रकार परिषद घेईन सांगितले पाहिजे, असेही सपकाळ म्हणाले.

## काँग्रेस म्हणजे बुडते जहाज, त्यात कोणीही बसणार नाही

### चंद्रशेखर बावनकुळेंची टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२ नागपूर**
राज्यातील राजकीय वर्तुळात काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या कथित विलिनीकरणाच्या चर्चांना सध्या उधाण आले आहे. मात्र, या चर्चांवर भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी जोरदार टीका केली आहे. काँग्रेस हे एक बुडते जहाज असून त्यात कोणीही बसायला तयार होणार नाही, अशा शब्दांत बावनकुळेंनी काँग्रेसवर निशाणा साधला आहे.

काँग्रेस-राष्ट्रवादी विलिनीकरणाच्या चर्चेवर प्रतिक्रिया देताना बावनकुळे म्हणाले की, मला वाटत नाही की शरद पवार आणि सुप्रिया सुळे असा निर्णय घेतील. त्यांना काँग्रेसचा इतिहास चांगलाच माहिती आहे. काँग्रेसमध्ये घराणेशाही आणि एकाधिकारशाहीचा मोठा प्रभाव आहे, तिथे कोणाचेही मत विचारात घेतले जात नाही. त्यामुळे भविष्याची चिंता करणारे नेते या पक्षात जाण्याचे धाडस करणार



नाहीत.

शरद पवार आणि रवींद्र चव्हाण यांच्या भेटीबाबत विचारलेल्या प्रश्नावर बोलताना बावनकुळे यांनी स्पष्ट केले की, राजकारणात 'जर-तर'च्या गोष्टींना फारसा अर्थ नसतो. काँग्रेसचे महत्त्व वाढवण्यासाठी अशा चर्चांना उगाच हवा दिली जात आहे. केवळ प्रकाशझोतात राहण्यासाठी हे सर्व सुरू आहे.

पण हे निश्चित आहे की, देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील एनडीएची सत्ता भक्कम राहील आणि भाजप ५१ टक्के मतांसह विजय मिळवेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. राहुल गांधींच्या २०४७ च्या स्वप्नांनाही त्यांनी फेटाळून लावले.

## डिझेल खरेदीवर केंद्र सरकारची मर्यादा; पेट्रोल-डिझेल पुरवठा नियंत्रणासाठी नवीन आदेश जारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती** जागतिक भू-राजकीय परिस्थिती, आंतरराष्ट्रीय पेट्रोलियम पुरवठा साखळीतील अडचणी आणि देशातील काही भागांत पेट्रोल-डिझेलच्या असामान्य खरेदीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने मोटर स्पिरिट आणि हाय स्पीड डिझेल (किरकोळ विक्री केंद्रांमार्फत पुरवठ्याचे तात्पुरते नियमन) आदेश जारी केला आहे. पेट्रोल पंपावर एका वाहनाला जास्तीत जास्त २०० लिटर डिझेल मिळणार आहे. हा आदेश ११ जून २०२६ रोजी राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आला असून तो तत्काळ लागू झाला आहे. आदेश म्हटले आहे, पेट्रोल (मोटर स्पिरिट) आणि डिझेल (हाय स्पीड डिझेल) या अत्यावश्यक वस्तू असून मालवाहतूक, प्रवासी वाहतूक, शेतीची कामे, आपत्कालीन सेवा, राष्ट्रीय सुरक्षा आणि अर्थव्यवस्थेच्या सुरळीत कामकाजासाठी त्यांचा अखंड पुरवठा आवश्यक आहे.

केंद्र सरकारच्या निरीक्षणानुसार, किरकोळ विक्री केंद्रांवरील (पेट्रोल पंपांवरील) आणि घाऊक विक्रीतील किंमतींमध्ये असलेल्या फरकामुळे अनेक औद्योगिक, व्यावसायिक आणि संस्थात्मक ग्राहक मोठ्या प्रमाणात पेट्रोल पंपांवरून डिझेल खरेदी करत आहेत. यामुळे सामान्य ग्राहकांसाठी राखीव असलेला पुरवठा वळविला जात असून काही भागांत स्थानिक तुटवड्याची शक्यता निर्माण झाली आहे. तसेच साठेबाजी, अनधिकृत विक्री आणि इतर गैरप्रकारांना चालना मिळण्याची



भीतीही व्यक्त करण्यात आली आहे.राज्य सरकारे आणि केंद्रशासित प्रदेश प्रशासनांना साठेबाजी, काळाबाजार, अनधिकृत खरेदी, पुरवठा वळविणे आणि इतर गैरप्रकारांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आवश्यक वस्तू कायदा १९५५ तसेच इतर लागू कायद्यांअंतर्गत अशा प्रकरणांवर कारवाई केली जाईल. या आदेशातील तरतुदींचे किंवा त्याअंतर्गत जारी करण्यात आलेल्या निर्देशांचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर आवश्यक वस्तू कायदा, १९५५ आणि इतर लागू कायद्यांनुसार दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

डिझेलवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असलेल्या कृषी क्षेत्रासाठी हा आदेश महत्त्वाचा मानला जात आहे. ट्रॅक्टर, हार्वेस्टर आणि सिंचनासाठी डिझेल वापरणाऱ्या शेतकऱ्यांना थेट मर्यादा लागू नसली तरी मोठ्या प्रमाणात डिझेल साठवून ठेवण्याच्या पद्धतींवर नियंत्रण येऊ शकते.

सरकारने मात्र सामान्य ग्राहक, शेतकरी आणि आवश्यक सेवांसाठी इंधनाचा पुरवठा अबाधित ठेवण्याचा उद्देश या आदेशामागे असल्याचे स्पष्ट केले आहे. एकूणच, देशभरात पेट्रोल आणि डिझेलचा न्याय्य व अखंड पुरवठा कायम ठेवण्यासाठी, साठेबाजी आणि गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने हा तात्पुरता नियामक आदेश लागू केला आहे.

## यावर्षी सरासरी किती पाऊस पडणार?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२मुंबई** ८ जून रोजी सूर्याने मृग नक्षत्रात प्रवेश केला. कोकणात पावसाला सुरुवात झाली. पंचांगातील पर्जन्य अंदाजा प्रमाणे सरासरी पाऊस पडेल, असे पंचांगकर्ते,



खगोल अभ्यासक दा. कृ. सोमण यांनी सांगितले. शेतकऱ्यांना पर्जन्य नक्षत्रे आणि त्यांची वाहने याची माहिती हवी असते. पंचांगातील पर्जन्य अंदाज हे प्राचीन नियमाप्रमाणे असतात, शेतकऱ्यांनी शेतीचे वेळापत्रक हे वेधशाळेनी वर्तविलेल्या अंदाजानुसार ठरवावे, असेही सोमण यांनी स्पष्ट केले.

## संपादकीय ......

# स्टँडअप कॉमेडीतील विकृती

अप कॉमेडियन प्रणित मोरे सध्या त्याच्या एका शोमधील ३७० रुपयांच्या बिर्याणीच्या वादावरून अडचणीत सापडला आहे. सोशल मीडियावर प्रसारित झालेल्या कथित अश्लील आणि आक्षेपार्ह मजकुराप्रकरणी महाराष्ट्र सायबरने प्रणित मोरे, हिमांशू जांगरा, डॉ. सेजल पवार आणि इतरांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मुळात स्टँडअप कॉमेडी हा प्रकार सत्तेला प्रश्न विचारणारा, समाजाच्या ढोंगीपणाला आरसा दाखवणारा आणि आपल्याला अस्वस्थ करणार्या वास्तवांशी खेळत त्यांच्यावर विचार करायला भाग पाडणारा असतो. तो केवळ हसवण्यासाठी नसतो; तो टोचतो, खुपसतो, उघड करतो. म्हणूनच जॉर्ज कार्लिनपासून ते अनेक समकालीन विनोदी कलाकारांपर्यंत सत्ताधारी, बहुसंख्य, विशेषाधिकारप्राप्त आणि सामाजिक वर्चस्व उपभोगणार्यांवर प्रहार करण्याची एक परंपरा दिसते. पण आपल्याकडे अनेकदा याच्या नेमके उलट घडताना दिसते. येथे विनोदाच्या नावाखाली दुर्बलांवर, स्त्रियांवर, अल्पसंख्याकांवर, त्यांच्या अनुभवांवर आणि त्यांच्या मानवी प्रतिष्ठेवर पंच मारले जातात. त्या पंचला धाडस, बिनधास्तपणा किंवा 'डार्क ह्युमर' म्हणून गौरवले जाते.

प्रणित मोरेच्या कार्यक्रमात हिमांशू जांगराने केलेले कथन हे याच प्रवृत्तीचे एक अत्यंत उघडीबोडके आणि अस्वस्थ करणारे उदाहरण आहे. प्रणितच्या कार्यक्रमात हिमांशूने सांगितले की, तो एका मुलीला डेटवर घेऊन गेला. त्याला तिला हॉटेलमध्ये न्यायचे होते, तिने नकार दिला. मग तो तिला बागेत घेऊन गेला. त्याने तिच्यावर खर्च केला, तिला ३७० रुपयांची बिर्याणी खाऊ घातली. त्याबदल्यात तिच्याकडून शरीरसुख मिळणे हा आपला हक्कच आहे, अशा थाटात त्याने कथन केले. पुढे त्या मुलीच्या शरीरासोबत काय केले, कसे केले, याची जवळपास चवीने केलेली वर्णनेही रंगवली गेली. सभागृहात हास्य पिकले. टाळ्या वाजल्या. प्रणितनेही त्याला 'ले ले, ले ले' म्हणत आणखी बोलते केले. या प्रसंगात सगळ्यात भीतीदायक गोष्ट म्हणजे त्या सभागृहात उपस्थित असलेल्या अनेक पुरुषांना यात काहीच गैर वाटले नाही. उलट, हे त्यांना रिलेटेबल वाटले. 'मी बिर्याणी खाऊ घातली, म्हणून माझे काहीतरी तिच्याकडून घेणे आहे,' हा विचार म्हणजे स्त्रीला मनुष्य न मानता व्यवहारातील वस्तू मानण्याचा विचार. जणू काही ती एखादी सेवा पुरवत आहे आणि पुरुषाने तिच्यासाठी खर्च केलेला पैसा म्हणजे त्याची गुंतवणूक आहे, ज्यावर त्याला परतावा हवा आहे. ही भाषा गलिच्छ आहेच, शिवाय ती धोकादायक आहे. यात प्रणित मोरेची भूमिका अधिक गंभीर ठरते. तो त्या तरुणाला थांबवू शकला असता. पण त्याने उलट त्या कथनाला खतपाणी घातले. खरे तर, विनोद हा समाजाचा आरसा असतो, असे म्हटले जाते. पण आरसा वास्तव दाखवतो की विकृतीचे समर्थन करतो, हेही तितकेच महत्त्वाचे असते. एखाद्या विनोदाचा केंद्रबिंदू जर स्त्रीच्या अस्तित्वाची टिंगल, तिच्या स्वायत्ततेची खिल्ली किंवा तिच्या मानवी प्रतिष्ठेचे अवमूल्यन असेल, तर तो केवळ विनोद राहत नाही; तो एका खोलवर रुजलेल्या मानसिकतेचे प्रदर्शन ठरतो. प्रत्येक वेळी स्त्रीला विनोदाचा विषय बनवले जाते, तेव्हा तिचे व्यक्तिमत्त्व दुय्यम ठरवून तिच्या शरीराला आणि तिच्या अस्तित्वाला प्राथमिकता दिली जाते.

स्त्री ही आई आहे, बहीण आहे, पत्नी आहे म्हणूनच तिला सन्मान मिळायला हवा का? की ती सर्वप्रथम एक स्वतंत्र नागरिक, विचार करणारी व्यक्ती आणि स्वत:च्या अस्तित्वाची मालकीण आहे म्हणून तिचा आदर व्हायला हवा? दुर्दैवाने आपण अजूनही पहिल्या टप्प्यात अडकलो आहोत. स्त्रीशी संबंधित प्रत्येक गोष्ट पुरुषांच्या नातेसंबंधांच्या चौकटीतूनच मोजली जाते. तिच्या स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाला स्वतंत्र मूल्य देण्याची तयारी समाजाने अद्याप पूर्णपणे दाखवलेली नाही. स्त्रीला उपभोगाच्या साधनाच्या चौकटीत अडकविणे ही नवी गोष्ट नाही. जाहिरातींपासून चित्रपटांपर्यंत, गाण्यांपासून सोशल मीडिया कंटेंटपर्यंत तिच्या शरीराचा वापर ग्राहक आकर्षित करण्यासाठी केला गेला. तिच्या बुद्धिमत्तेपेक्षा तिच्या दिसण्याला महत्त्व देण्यात आले. तिच्या कर्तृत्वापेक्षा तिच्या बाह्यरूपावर चर्चा झाली. मग समाजाने हे इतके सहज स्वीकारले की त्यातील विकृतीच दिसेनाशी झाली. याचा अर्थ असा नाही की विनोद बंद व्हावेत किंवा कलाकारांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्य गमवावे. उलट, विनोद अधिक धारदार, अधिक बौद्धिक आणि अधिक संवेदनशील होऊ शकतो. समाजातील विसंगतींवर भाष्य करता येते, सत्तेला प्रश्न विचारता येतात, व्यवस्थेवर उपहास करता येतो. पण एखाद्या घटकाच्या मानवी प्रतिष्ठेची किंमत मोजून मिळविलेल्या टाळ्या या शेवटी स्वस्त लोकप्रियतेचे प्रतीक ठरतात. ३७० रुपयांच्या बिर्याणीवरून सुरू झालेल्या या वादात खरा प्रश्न बिर्याणीचा नाही. प्रश्न आहे, आपण स्त्रीला कोणत्या नजरेने पाहतो याचा. तिच्या स्वाभिमानापेक्षा आपल्याला विनोद महत्त्वाचा वाटतो का? तिच्या व्यक्तिमत्त्वापेक्षा तिचे वस्तुकरण आपल्याला अधिक सहज वाटते का? सर्वात महत्त्वाचे म्हणजे, समाज म्हणून आपण अजूनही स्त्रीला माणूस म्हणून स्वीकारले आहे का? स्त्री ही उपभोगाची वस्तू नाही. ती कोणाच्याही मनोरंजनासाठी उपलब्ध ठेवलेली प्रतिमा नाही. ती स्वतंत्र विचारांची, भावना असलेली, स्वप्ने पाहणारी आणि स्वत:च्या आयुष्याचे निर्णय घेण्याचा अधिकार असलेली व्यक्ती आहे. तिच्या प्रतिष्ठेची किंमत कोणत्याही बिर्याणीपेक्षा, कोणत्याही विनोदापेक्षा आणि कोणत्याही टाळ्यांपेक्षा कितीतरी मोठी आहे.

# मान्सूनपूर्व कापूस लागवड

## पावसाच्या प्रतीक्षेत शेतकरी चिंताग्रस्त

### तिवसा तालुक्यातील तळेगाव ठाकूर येथील शेतकऱ्यांची व्यथा..

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२तळेगाव ठाकूर** – मृग नक्षत्र सुरू होऊनही अपेक्षित पाऊस न झाल्याने तिवसा तालुक्यातील तळेगाव ठाकूर परिसरातील शेतकरी चिंतेत सापडले आहेत. पावसाच्या आशेवर मान्सूनपूर्व कापूस लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांसमोर आता पिके वाचविण्याचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे.

तळेगाव ठाकूर येथील प्रगतशील शेतकरी दादाराव घोरमाडे यांनी १ जूनपासून पाच एकर क्षेत्रात कापूस पिकाची लागवड सुरू केली. यासाठी त्यांनी प्रत्येकी सुमारे ९०० रुपये किमतीच्या १२ बॅग बियाण्यांचा वापर केला. मजुरांच्या साहाय्याने लागवड करण्यात आली असून यावर मोठा खर्च झाला आहे.



परिसरातील अनेक शेतकऱ्यांची स्थिती यापेक्षा वेगळी नसून, आकाशाकडे डोळे लावून बसलेल्या शेतकऱ्यांना आता पावसाची प्रतीक्षा लागली आहे. वेळेत पाऊस न झाल्यास खरीप हंगामासह बागायती पिकांनाही मोठा फटका बसण्याची शक्यता व्यक्त होत आहे. **–प्रगतशील शेतकरी दादाराव घोरमाडे**

यंदा परिसरात ४५ ते ४६ अंश सेल्सिअस एवढे तीव्र तापमान असतानाही तुषार सिंचनाच्या माध्यमातून पाणी देत कापूस पीक उगविण्यात आले. सिंचनामुळे कापसाची रोपे दोन ते तीन इंच उंचीपर्यंत वाढली असून उगवण समाधानकारक झाली आहे. मात्र, पाऊस लांबल्याने पिकाला नियमित पाणी देण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे.

एकीकडे कापूस पीक वाचविण्याची धडपड सुरू असताना दुसरीकडे संत्रा बागायतीवरील संकट अधिकच गडद होत आहे.

पाण्याअभावी अनेक ठिकाणी संत्र्याची झाडे वाळण्याच्या स्थितीत असून उपलब्ध पाणी कापूस पिकाला द्यायचे की संत्रा बागेला, असा गंभीर प्रश्न शेतकऱ्यांसमोर निर्माण झाला आहे. याशिवाय वन्य प्राण्यांपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठीही शेतकऱ्यांना अतिरिक्त मेहनत घ्यावी लागत आहे.

पावसाच्या आशेवर मोठा खर्च करून कापूस लागवड केली. तुषार सिंचनामुळे पीक उगवले असले तरी आता पाऊस न झाल्यास पिकाचे नुकसान होण्याची भीती आहे.

एकीकडे कापूस पीक तर दुसरीकडे संत्रा बागायती वाचविण्याचे आव्हान आहे. पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून लवकरात लवकर दमदार पाऊस होणे अत्यंत गरजेचे आहे.

# सहा वर्षात २५ बालकामगारांची सुटका

## ५८ धाडसत्रात १८१ आस्थापनांना भेटी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अमरावती**

१२ जून रोजी जागतिक बालकामगार प्रथा विरोधी दिवस साजरा करण्यात येतो. त्या पृष्ठभूमीवर जिल्हा कामगार विभागाने गत सहा वर्षात केलेल्या कारवाईचा आढावा दिलेला आहे.जिल्ह्यात सन २०२१ ते सन २०२६ पर्यंत ५८ धाडसत्र राबविण्यात आले. यात १८१ आस्थापनांना भेटी देऊन २५ बालक, बालकामगार मुक्त केले आहेत. यामध्ये १४ वर्षाचे आतील १० बालकामगार आहे. तसेच १४ वर्षावरील १५ बालक आहे. बालकामगार कामावर ठेवलेल्या ८ मालकावर बालकामगार अधिनियम, १९८६ अंतर्गत न्यायालयात खटले दाखल करण्यात आले आहेत. मुक्त केलेल्या बालकामगारांच्या शैक्षणिक पुनर्वसनाकरिता शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद व महापालिका यांच्यामार्फत १४ वर्षाखालील बालकामगाराचे पुनर्वसन करण्यात येते. बालकामगार या



अनिष्ठ प्रथेतून राज्य मुक्त करण्यासाठी जिल्हाधिकार्यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या कृतीदलाची बैठक घेण्यात येते.

तसेच केंद्र शासनाच्या बाल व किशोरवयीन कामगार अधिनियमानुसार १४ वर्षाखालील बालकांना कोणत्याही व्यवसाय, प्रक्रियेत कामावर ठेवणे, तसेच १४ वर्ष पूर्ण परंतू १८ वर्ष पूर्ण न झालेल्या किशोरवयीन मुलांना धोकादायक उद्योग व प्रक्रियेमध्ये कामावर ठेवणे गुन्हा आहे. जर मालकाने, नियोक्त्याने बाल अथवा किशोरवयीन मुलांना कामावर ठेवल्यास ६ महिने ते २ वर्षापर्यंत कारावास किंवा २० हजार ते ५० हजार रुपयांपर्यंत दंड किंवा दोन्हीही अशी शिक्षा होऊ शकते.

भारतीय राज्यघटनेनुसार शिक्षण आणि आरोग्य बालकांचे मुलभूत अधिकार आहेत. बालकाचे हे अधिकार अबाधित ठेवण्यासाठी बालमजुरी प्रथा कायमस्वरुपी नष्ट होणे आवश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाने हे मान्य केले असून १४ वर्षाखालील मुलांना बालमजुरी करण्यास प्रवृत्त करणार्याविरुद्ध जबर शिक्षेची तरतूद केली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व दुकाने, आस्थापनाधारक, उद्योजकांनी बाल व किशोरवयीन कामगारांना कामावर ठेवू नये, असे आवाहन कामगार विभागाने केले आहे.

# 'कृषी मित्र' भरतीच्या नावाखालील बोगस जाहिरातींपासून सावध राहा

## दत्तात्रय भरणे यांचे आवाहन

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१२मुंबई** राज्यात 'कृषी मित्र' भरतीच्या नावाखाली सोशल मीडिया आणि इतर माध्यमांद्वारे काही व्यक्तींकडून बोगस जाहिराती प्रसारित करून शेतकरी, युवक व नागरिकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न होत असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा कोणत्याही खोट्या जाहिरातींवर विश्वास ठेवू नये, तसेच कोणीही याला बळी पडून नये, असे आवाहन कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले आहे.कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या कोणत्याही भरती प्रक्रियेची माहिती केवळ शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर, अधिकृत प्रसिद्धी माध्यमांद्वारे किंवा संबंधित कार्यालयांमार्फतच जाहीर केली जाते. त्यामुळे सोशल मीडियावर प्रसारित होणाऱ्या अप्रमाणित जाहिराती, अर्जासाठी शुल्क भरण्याच्या सूचना, वैयक्तिक बँक खात्यावर पैसे जमा करण्याचे आवाहन किंवा संशयास्पद लिंक यांना बळी पडू नये.

यासंदर्भात माहिती देताना कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की,



कृषी मित्र भरतीच्या नावाखाली शेतकरी, युवक आणि नागरिकांची फसवणूक करण्याचा प्रयत्न करणाऱ्या कोणतीही गय केली जाणार नाही. खोट्या व दिशाभूल करणाऱ्या जाहिराती प्रसारित करून फसवणूक करणाऱ्या व्यक्ती अथवा संबंधितांवर कृषी विभागामार्फत फौजदारी गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. नागरिकांनी अशा बोगस जाहिरातींपासून सावध राहून भरतीसंदर्भातील माहितीची खातरजमा अधिकृत माध्यमांतूनच करावी.नागरिकांनी कोणत्याही संशयास्पद जाहिराती किंवा संदेश आढळल्यास तात्काळ संबंधित कृषी विभागाच्या कार्यालयास अथवा स्थानिक पोलीस प्रशासनास माहिती द्यावी, असेही आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे.

# मालखेड तलावावर पूरग्रस्तांच्या बचाव कार्यासाठी रंगीत तालीम

## मान्सूनपूर्व पूर आपत्तीचा सामना करण्यासाठी प्रशासन सज्ज

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२चांदुर रेल्वे**

आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात उद्भवू शकणाऱ्या पूर परिस्थितीचा यशस्वी सामना करण्यासाठी जिल्हा प्रशासन पूर्णपणे सज्ज झाले आहे. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आशिष येरेकर यांच्या आदेशाने 'मॉकड्रिल'चे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल नागपूर आणि जिल्हा शोध व बचाव पथक, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने या थरारक प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले होते.

निवासी उपजिल्हाधिकारी व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी संतोष काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली चांदूर रेल्वे तालुक्यातील मालखेड तलाव येथे जिल्हास्तरीय पूर आपत्ती व्यवस्थापन रंगीत तालीम (मॉकड्रिल) पार पडली. या रंगीत तालीमीदरम्यान पुराच्या पाण्यात अडकलेल्या नागरिकांची सुरक्षित सुटका करणे, त्यांना तातडीने सुरक्षित स्थळी हलवणे आणि पूर



परिस्थितीमुळे घरांची पडझड किंवा इतर आपत्ती ओढवल्यास शोध व बचाव पथकाच्या माध्यमातून जीवितहानी कशी टाळायची, याचे थेट सादरीकरण करण्यात आले. विशेषतः ग्रामीण भागात पूर परिस्थिती निर्माण झाल्यास ती स्थानिक पातळीवर कशी हाताळावी, याचे तंत्रशुद्ध प्रशिक्षण एनडीआरएफ नागपूर आणि जिल्हा शोध व बचाव पथकातील तज्ज्ञांनी विविध प्रात्यक्षिकांद्वारे दिले. तसेच, आपत्कालीन परिस्थितीत महसूल, पोलीस आणि आरोग्य विभागातील शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या काय असाव्यात, याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सुरेंद्र रामेकर, चांदूर रेल्वेचे नायब तहसीलदार अनिल चौरे, पोलिस निरीक्षक मिश्रा, पोलिस निरीक्षक यादव, एनडीआरएफ नागपूरचे डॉ. झा, मुंबई मंत्रालयातील आपत्ती व्यवस्थापन तज्ज्ञ अनुराग कचोरी, महसूल अधिकारी प्रमोद शिरसाठ, तलाठी दीपक चव्हाण, आरोग्य यंत्रणेचे डॉ. अविनाश पवार, प्रीती पवार, सौरव पाठक, मनोज माकोडे आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी सचिन धरमकर, विशाल लिमकर, आकाश निमकर, कौस्तुभ वैद्य, सुमित बांबल, प्रतिक कडू, नारायण दवंगे, अशोक निंबरते तसेच 'आपला मित्र' संस्थेचे तुषार गोंडाणे व अमोल गोंडाणे यांनी प्रत्यक्ष पाण्यात उतरून शौर्यपूर्ण बचावकार्याची प्रात्यक्षिके सादर केली. कार्यक्रमाचे संचालन सुरेंद्र रामेकर यांनी केले.

# विकासकामांमध्ये गुणवत्ता राखण्यात यावी

## खोलापूर–म्हैसपूर भेटीत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दिले निर्देश

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१२खोलापूर,**

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी यांनी भातकुली तालुक्यातील खोलापूर व म्हैसपूर या गावांना भेट देऊन विविध विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी आरोग्य, शिक्षण, ग्रामविकास, स्वच्छता व पायाभूत सुविधांबाबत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना देत कामांमध्ये गुणवत्ता व गती राखण्याचे निर्देश दिले. खोलापूर येथील प्राथमिक आरोग्यकेंद्राला भेट देऊन त्यांनी आरोग्यसेवा, उपलब्ध पायाभूत सुविधा तसेच राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेतला. दवाखान्यातील सर्व वैद्यकीय उपकरणे व संगणक यंत्रणा सुस्थितीत ठेवण्यासोबतच औषध वितरण आणि इतर



कार्यालयीन कामकाज पूर्णपणे ऑनलाइन पद्धतीने करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. प्राथमिक आरोग्यकेंद्राच्या बळकटीकरणासाठी प्रशासनामार्फत छत दुरुस्ती करण्यात येणार असून ग्रामपंचायतच्या माध्यमातून इन्व्हर्टर, ऑपरेशन थिएटरसाठी वातानुकूल यंत्रणा तसेच अत्याधुनिक मॉड्युलर ओटी उभारण्यासाठी आवश्यक सहकार्य केले जाईल, असे त्यांनी सांगितले. आशा कार्यकर्त्यांसाठी बैठक हॉल उभारण्याबाबत बांधकाम विभागाने अंदाजपत्रक सादर करावे, असे निर्देशही त्यांनी दिले. तसेच अंगणवाडी केंद्रालाही भेट देऊन सुविधांची पाहणी केली व आवश्यक सूचना दिल्या. गावातील दुग्ध व्यवसायाचे वाढते प्रमाण लक्षात घेता महिला बचतगटांनी दुग्ध उत्पादन व्यवसायासाठी गट स्थापन करून उद्योग सुरू करावा, असा सल्लाही त्यांनी दिला. यावेळी प्राथमिक आरोग्यकेंद्र, खोलापूरला राष्ट्रीय स्तरावरील एनक्यूएएस पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल तसेच भातकुली तालुक्यातील ४८ पैकी ४७ ग्रामपंचायती क्षयरोगमुक्त झाल्याबद्दल त्यांनी विशेष कौतुक केले. दरम्यान, ग्रामपंचायतीने मॉन्सूनपूर्व तयारी पूर्ण करावी, सोबतच गावातील सर्व नाल्यांची साफसफाई करून तसा अहवाल सादर करण्याचे सूचित केले. त्यानंतर म्हैसपूर येथे भेट देऊन जनसुविधा योजनेतून उभारण्यात आलेल्या ग्रामपंचायत भवनात उपस्थित नागरिकांशी संवाद साधला. तसेच जिल्हा परिषद शाळेला भेट देऊन शैक्षणिक व भौतिक सुविधांचा आढावा घेतला. गावातील आरओ पाणी शुद्धीकरण केंद्राची पाहणी करताना त्यांनी स्वतः कॉईन टाकून पाणीपुरवठा सुरळीत सुरू असल्याची खात्री केली. यावेळी त्यांनी प्रधानमंत्री आवास योजनेतील पात्र लाभार्थ्यांच्या घरी प्रत्यक्ष भेटी देऊन घरकुल बांधकामांची पाहणी केली. लाभार्थ्यांच्या घरांवर सौरऊर्जा पॅनेल बसविण्यात यावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. पाहणी दौऱ्यादरम्यान स्मशानभूमी परिसरालाही भेट देऊन तेथे ग्रामपंचायतने वृक्षारोपण करून नागरिकांसाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्याचे निर्देश दिले. तसेच गावातील सांडपाणी व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी मोठ्या क्षमतेचा शोषखड्डा उभारण्याबाबतही त्यांनी सूचना केल्या.

# उलगडा; काजल इंगळेचा मारेकरी निघाला तिचा सख्खा मावस भाऊच

## ३० रुपयांचे पेट्रोल अन् आगपेटीने आरोपी सापडला जाळ्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२ अमरावती**

तपोवन परिसरातील जंगलात २ जून रोजी जळालेल्या अवस्थेत एका तरुणीचा मृतदेह आढळून आला होता. दोन दिवसांनंतर पोलिसांनी मृतदेहाची ओळख पटवली. डीएनए चाचणीच्या आधारे हा मृतदेह काजल जितेंद्र इंगळे (वय २२) या तरुणीचा असल्याचे स्पष्ट झाले. मात्र, या प्रकरणातील आरोपी पोलिसांच्या हाती लागत नव्हता. अखेर सखोल तपासानंतर गुन्हे शाखेने गुरुवारी (दि. ११) दुपारी काजलच्या मावस भावाला अटक केली असून या गुंतागुंतीच्या हत्येचा उलगडा करण्यात शहर पोलिसांना नवव्या दिवशी यश आले आहे.



चेतन सुनील थोरात (२३, रा. तेजस विहार, राजुरा) असे पोलिसांनी पकडलेल्याचे नाव आहे. चेतन हा काजलचा सख्खा मावस भाऊ आहे. काजल इंगळे ही मूळची विश्रोळी येथील रहिवासी होती. ती काही काळ राजुरा भागात भाड्याच्या खोलीत राहत होती. मे महिन्यात तिने ती खोली सोडली होती. काजलचे जून महिन्यात लग्न होणार होते. दरम्यान काही कामानिमित्त ती ३० मे रोजी अमरावतीत आली होती. त्यादिवशी ती राजुरा येथे राहणाऱ्या मावशीकडे, म्हणजेच चेतनच्या घरी थांबली होती. ३१ मे रोजी सायंकाळी सुमारे चार ते साडेचार वाजताच्या सुमारास चेतन काजलला सोबत घेऊन तपोवन परिसरात फिरायला गेला.

आयुक्तांनी केली चौकशी

चेतनवर संशय बळावल्यानंतर गुन्हे शाखेने त्याची कसून चौकशी सुरू केली होती.दुपारी पोलिस आयुक्त राकेश ओला स्वतः गुन्हे शाखेच्या कार्यालयात पोहोचले. त्यांनी सुमारे अर्धा तास चेतनची सखोल चौकशी केली. यावेळी चेतनने खुनाची कबुली दिली आव्हान ठरलेल्या या हत्याकांडाचा उलगडा झाला.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब – पोर्टल /ई – पेपर

### जन्म प्रमाणपत्र घोटाळ्यात नवा खुलासा

# अमरावतीतही चौकशीचे आदेश - किरीट सोमय्या



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती:** भाजप नेते किरीट सोमय्या यांनी आज अमरावती दौऱ्यावर मनपा आयुक्तांची भेट घेत जन्म प्रमाणपत्र घोटाळ्याचा मुद्दा उपस्थित केला. यावेळी त्यांनी या प्रकरणात आणखी एक मोठा घोटाळा समोर आल्याचा दावा केला.

सोमय्या म्हणाले की, देवेंद्र फडणवीस सरकारच्या काळात सुमारे ३ लाख जन्म प्रमाणपत्रे रद्द करण्यात आली होती. मात्र आता करेक्शनच्या नावाखाली नवीन जन्म प्रमाणपत्रे दिली जात असून जुनी प्रमाणपत्रे कायम ठेवण्यात आली आहेत. नावात बदल करून दुसरे प्रमाणपत्र देणे हे पूर्णपणे बेकायदेशीर असून हा एक मोठा घोटाळा असल्याचा आरोप त्यांनी केला.

मुंबईत अशा प्रकारची सुमारे ८७ हजार प्रमाणपत्रे देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकरणाची चौकशी सध्या पोलिसांच्या एसआयटीमार्फत सुरू आहे. तसेच कल्याण-डोंबिवली महानगरपालिका आणि लोणावळा येथेही चौकशी समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. नागपूरमध्येही मनपा आयुक्तांनी समिती गठित केल्याचे सोमय्या यांनी सांगितले. अमरावतीतही या प्रकरणाची दखल घेण्यात आली असून मनपा आयुक्तांनी चौकशीसाठी १५ दिवसांचा अवधी मागितला आहे. लवकरच चौकशी प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे.

# अमरावतीमध्ये दोन राजकीय कट्टर विरोधक एकत्र

# प्रवीण पोटे - आ. रवी राणांचे मनोमिलन

### भाजप खा. डॉ. अनिल बोंडे संकटमोचक, राणांच्या कार्यालयात येत प्रवीण पोटेकडून रवी राणांचे स्वागत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**
:अमरावती विधान परीषद निवडणुकीची रणधुमाळी आता खऱ्या अर्थाने रंगायला सुरुवात झाली आहे. काँग्रेस उमेदवार हर्षजीत देशमुख रुग्णालयात दाखल झाल्यानंतर एक वेगळेच आणि धक्कादायत वादंग अमरावतीच्या राजकीय वर्तुळात निर्माण झाले. या घडोमोडीवर गरमागरम चर्चा सुरु असताना शनिवारला सायंकाळी अमरावतीच्या राजकारणात आणखी एक धमाका झाला. अमरावती शहराच्या नव्हे तर जिल्ह्याच्या राजकारणात दोन कट्टर वैरी म्हणून ओळख असलेले दोन नेते अर्थात माजी पालकमंत्री आणि विधान परीषद निवडणुकीत भाजपचे (महायुती) उमेदवार आणि युवा स्वाभिमानीचे आ. रवि राणा यांचे मनोमिलन झाले.

भाजपचे राज्यसभेचे खा. डॉ. अनिल बोंडे हे या संपूर्ण मनोमिलन महानाट्यात संकटमोचक ठरले, हे विशेष. या दोन कट्टर राजकीय वैरी असलेल्या दोन नेत्यांचे मनोमिलन झाल्याने आता अमरावती विधानपरीषद निवडणूक वेगळ्याच वळणावर पोहोचली आहे.

विधानपरिषद निवडणुकीसाठी १८ जून रोजी मतदान होणार आहे. भाजपने सलग तिसऱ्यांदा उमेदवारीदिलेले माजी मंत्रीप्रवीण पोटे यांनी आपला प्रचार तीव्र केला आहे. ते महायुतीमधील नेत्यांच्या घरी नियमितपणे भेटी देऊन आदरणीय ज्येष्ठ नेत्यांचे आशीर्वाद घेत आहेत. तसेच त्यांचे स्वागत करीत आहे. याच मालिके दरम्यान, गुरुवारी रात्री सुमारे साडेनऊ वाजता प्रवीण पोटे यांनी शंकर नगर रोडवरील आ. रवी राणा यांच्या युवा स्वाभिमान जनसंपर्क कार्यालयाला भेट देऊन आमदार रवी राणा यांची भेट घेतली.त्यांनी उपस्थित युवा स्वाभिमान नगरसेवकांची सदिच्छा भेट घेतचर्चा केली. विशेष म्हणजे प्रवीण पोटे हे कार्यालयातपोहोचताच दोन्ही नेत्यांनी एकमेकांना नमस्कार केला.



त्यानंतर प्रवीण पोटे यांनी शाल देवून स्वागत केले. तर सुनिल राणा यांनी सुद्धा प्रवीण पोटे यांचे पुष्पगुच्छ देत स्वागत केले. यावेळी सर्वात महत्वाची बाब म्हणून राज्यसभेचे भाजचे खा. डॉ. अनिल बोंडे यांनी मध्यस्ती करून संकटमोचक म्हणून भूमिका बजावली हे विशेष. दरम्यान, या दोन्ही नेत्यांमध्ये अर्धातास वर्तमान राजकीय स्थिती व निवडणुकीवर अर्धा तास चर्चा झाली. यावेळी प्रवीण पोटे, आ. रवि राणा यांच्याशिवाय सुनिल राणा, उपमहापौर सचिन भेंडे आदी उपस्थित होते.

पत्रकारांशी बोलताना प्रवीण पोटे यांनी सांगितले की, ते महायुतीमधील सर्व ज्येष्ठ नेत्यांना नियमितपणे भेटत असतात. आमदार रवी राणा हे महायुतीच्या घटक पक्षाचे एक प्रमुख नेते असल्यामुळेच त्यांनी त्यांची भेट घेतली. आमदार रवी राणा यांनी या भेटीला महायुतीच्याआहे. त्यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार अमरावतीमध्ये महायुतीचे उमेदवार प्रवीण पोटे यांना एकतर्फी विजय मिळवून देण्याचे निर्देश मिळाले आहे. परिणामी, पोटे हे महायुती आघाडीतील सर्व पक्षांच्या नेत्यांना भेटत आहेत, असे आ. राणांनी सांगितले.-

# १४ गटशिक्षणाधिकाऱ्यांना 'शो कॉज'

### वेतन देयके वेळेत सादर न केल्याने सीईओ सत्यम गांधी यांची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती** - जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांचे वेतन प्रत्येक महिन्याच्या १ तारखेला अदा व्हावे. यासाठी निश्चित करण्यात आलेल्या वेळापत्रकाचे पालन न करणाऱ्या जिल्ह्यातील १४ पंचायत समित्यांच्या गटशिक्षणाधिकाऱ्यांबाबत जिल्हा परिषद प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. वेतन देयके वेळेत सादर करण्यात वारंवार दिरंगाई होत असल्याने मुख्य कार्यपालन अधिकारी सत्यम गांधी यांच्या निर्देशानुसार संबंधित १४ गटशिक्षणाधिकाऱ्यांना शो कॉज बजावण्यात आली आहे. या कारवाईमुळे शिक्षण विभागात एकच खळबळ उडाली आहे.

#### शिक्षण विभागात खळबळ



जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक संवर्गातीलकर्मचाऱ्यांचे वेतन नियमित व वेळेत अदा व्हावे. यासाठी शिक्षण विभागाने वेतन देयके सादर करण्याचे स्पष्ट वेळापत्रक निश्चित केले आहे. तसेच कोणत्याही प्रकारचा विलंब होऊ नये. यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना वेळोवेळी सूचना व सक्त निर्देशही देण्यात आले होते. मात्र, यानंतरही काही पंचायत समित्यांकडून वेतन देयके विहित मुदतीत सादर केली जात नसल्याचे निदर्शनास आले. प्रशासकीय निष्काळजीपणा आणि उदासीनतेमुळे वेतन प्रस्ताव वेळेत न आल्याने प्राथमिक शिक्षकांचे वेतन दरमहा १ तारखेला अदा करण्यात अडचणी निर्माण होत आहेत.परिणामी शिक्षक आणि कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून विविध शिक्षक संघटनांकडून आंदोलन, निवेदने तसेच समाज माध्यमांद्वारे प्रशासना विरोधात टीका केली जात आहे. जिल्हा परिषद प्रशासनाने या प्रकाराची गंभीर दखल घेतली आहे. वरिष्ठ कार्यालयाच्या स्पष्ट आदेशांचे पालन न करणे, प्रशासकीय कामकाजात हलगर्जीपणा करणे, शासकीय कार्यात अकार्यक्षमता दाखविणे आणि शिक्षकांच्या वेतन वितरणात विलंब होण्यास कारणीभूत ठरणे ही गंभीर बाब असल्याचे नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे. वेतन देयके वेळेत सादर न झाल्याने जिल्हा परिषदेची प्रतिमा मलिन होत असून शिक्षकांच्या आंदोलनामुळे आणि समाजमाध्यमांवरील नकारात्मक चर्चेमुळे प्रशासनाची बदनामी होत असल्याचेही नोटीसमध्ये नमूद करण्यात आलेले आहे. त्यावर संबंधित गटशिक्षणाधिकाऱ्यांकडून निश्चित मुदतीत खुलासा मागविण्यात आला आहे. प्रशासनाच्या या कारवाईमुळे जिल्ह्यातील शिक्षण विभागात खळबळ उडाली असून भविष्यात अशा प्रकारच्या दिरंगाईबाबत अधिक जबाबदारीने काम करण्याचा संदेश प्रशासनाने दिला आहे.

# पुणे विभागात ब्लॉकमुळे १३, १४ जून रोजी नागपूर-पुणे-नागपूर एक्सप्रेस रद्द

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**
मध्य रेल्वेच्या पुणे विभागांतर्गत पुणे यार्डमध्ये डीसीएस कार्यासाठी विशेष ब्लॉक घेण्यात आल्यामुळे १३ व १४ जून रोजी नागपूर-पुणे, पुणे-नागपूर एक्सप्रेस रद्द करण्यात आली आहे. त्यामुळे अमरावतीकर प्रवाशांची गैरसोय होणार आहे. प्रवाशांना आता इतर पर्यायी वाहनाचा वापर करावा लागणार आहे.मध्य रेल्वेच्या पुणे विभागांतर्गत पुणे यार्ड येथे विद्यमान रेल्वे संरचनेतील डीडीएस पॉईंट क्र. २०८/२०९ बदलण्यासाठी तसेच यार्डमधील सिग्नल व पॉईंट



व्यवस्थेच्याआधुनिकीकरणासाठी अंतर्गत महत्त्वपूर्ण अभियांत्रिकी व सिग्नलिंग काम हाती घेण्यात येणार आहे. बडनेरा स्टेशनवरून पुण्याकडे जाणारी गाडी क्र. १२९३६ नागपूर ते पुणे एक्सप्रेस १३ जून रोजी नागपूर येथून रद्द करण्यात आली आहे. हीएक्सप्रेस रात्री ९.१० वाजताच्या सुमारास बडनेरा स्टेशनवर येते. त्याचप्रमाणे गाडी क्र. १२९३५ पुणे ते नागपूर एक्सप्रेस १४ जून रोजी पुणे येथून रद्द करण्यात आली आहे. ही पहाटे ५३५ वाजताच्या सुमारास बडनेरा स्टेशनवर येते.

### अमरावती-पुणे एक्सप्रेस हडपसर पर्यंतच धावणार

दररोज रात्री १०.५० वाजता निघणारी गाडी क्र. ११४०९ अमरावती - पुणे एक्सप्रेस १३ जून रोजी अमरावतीहून निघाल्यानंतर पुण्यात जाणार नाही तर हडपसर येथेच थांबेल. तेथून प्रवाशांना पर्यायी वाहनाने पुण्याला जावे लागेल. पुण्याला अमरावतीहून जाणाऱ्या प्रवाशांची संख्या फार मोठी आहे. कधी त्यांना तिकीट रद्द करावे लागत असून कधी पर्यायी वाहनांचा ऐनवेळी आधार घ्यावा लागत आहे. काहींना तर ऐनवेळी प्रवासाचा बेत रद्द करावा लागत आहे.

# प्रलंबित प्रश्नांवर तोडगा न निघाल्यास नगरसेवक अनिल अग्रवालांचे उपोषण

### गैरव्यवहारांविरोधात समिती गठित करण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती-**
तत्कालिन महानगर पालिका आयुक्त डॉ. प्रवीण आष्टीकर यांनी त्यांच्या कार्यकाळात केलेल्या आर्थिक गैरव्यवहारांची चौकशी करण्यासाठी आमसभेत ठरल्याप्रमाणे समितीचे गठन करण्यात यावे, अन्यथा आपण मनपा मुख्यालयात बेमुदत उपोषण करू, असा इशारा काँग्रेसचे नगरसेवक तथा ज्येष्ठ पत्रकार अनिल अग्रवाल यांनी महापौर श्रीचंद तेजवानी यांना दिलेल्या निवेदनातून केले आहे.एप्रिल महिन्यात झालेल्या आमसभेत नगरसेवक अनिल अग्रवाल यांनी तत्कालिन आयुक्त आष्टीकर यांच्या कार्यकाळात झालेल्या



भ्रष्टाचाराचा मुद्दाउपस्थित केला होता. त्यानंतर काँग्रेससह सर्वपक्षीय नगरसेवकांनी या प्रकरणी चौकशी समिती गठित करण्याची एकमुखी मागणी करीत तसा ठरावी केला होता. परंतु, सुमारे दोन महिन्यांचा कालावधी उलटला तरी अद्याप महानगर पालिकेद्वारे चौकशी समितीचे गठन तर सोडाच यासंदर्भात हालचालही नाही. ते बघता नगरसेवक अग्रवाल यांनी महापौरांना दिलेल्या निवेदनात १५ दिवसांचा अल्टीमेटम दिला आहे. या १५ दिवसांच्या कालावधीत जर चौकशी समिती स्थापन झाली नाही तर आपण मनपा मुख्यालयात बेमुदत उपोषण सुरू करू असा अल्टीमेटमही त्यांनी दिला आहे. या प्रसंगी काँग्रेसचे पदाधिकारी सुरेशरतावा, भेले उपस्थित होते.

# धुऱ्याच्या वादातून ७ संत्र्याची झाडे तोडली

### शेतकऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल
### निंभोरा शेतशिवारातील घटना

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.१२चा.बाजार**
शेताच्या धुऱ्यावरून झालेल्या वादातून चांदूरबाजार तालुक्यातील निंभोरा येथे एका शेतकऱ्याने शेजाऱ्याची ७ संत्र्याची झाडे तोडून लाखो रुपयांचे नुकसान केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी चांदूरबाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पीडित शेतकरी देविदास गायकी आणि आरोपी हेमंत अवघड यांची शेती निंभोरा येथे एकमेकांच्या शेजारी आहे. दोघेही वेगवेगळ्या कुटुंबातील आहेत. धुऱ्यावरून वाद झाल्यानंतर हेमंत अवघड यांनी रागाच्या भरात देविदास गायकी यांच्या बागेतील ७ संत्र्याची झाडे तोडून टाकली. असून लाखो रुपयांचे नुकसान केले आहे.वर्षानुवर्षे जपलेली बाग उध्वस्त झाल्याने शेतकऱ्याचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

या प्रकरणी देविदास गायकी यांनी चांदूरबाजार पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली असून पोलिसांनी हेमंत अवघड याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असूनदेविदास गायकी यांनी आरोपीविरुद्ध कठोर कारवाईची मागणी केली आहे. शेतजमिनीच्या वादातून शेतकऱ्याच्या कष्टावर घाला घालणारी ही घटना तालुक्यात चर्चेचा विषय बनली आहे.

# पश्चिम विदर्भात १५० दिवसांत ३१२ शेतकऱ्यांची आत्महत्या

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.१२अमरावती-** पश्चिम विदर्भात शेतकरी आत्महत्यांचे सत्र थांबता थांबलेले नसल्याचे विदारक चित्र आहे. विभागातील पाचही जिल्ह्यात मे अखेरपर्यंत म्हणजेच १५० दिवसांत तब्बल ३१२ शेतकऱ्यांनी मृत्यूचा फास ओढला आहे. हे सर्व शेतकरी अस्मानी सुल्तानी संकटाचे बळी ठरले आहे. विभागात सन २००१ पासून २२,४९० शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्याचे वास्तव आहे.

### राज्यात सर्वाधिक प्रकरणे यवतमाळ जिल्ह्यात

राज्यात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या यवतमाळ जिल्ह्यात होत आहे. यंदाच्या पाच महिन्यात तब्बल १०५ शेतकरी आत्महत्या झाल्या आहेत. अमरावती जिल्ह्यात ६२ अकोला ५९, बुलढाणा ४० तर वाशिम जिल्ह्यात ४६ शेतकरी संकटांचे बळी ठरले आहेत.



शासनाने यापूर्वी दोन वेळा कर्जमाफी केली व आता पुन्हा तिसऱ्यांदा कर्जमाफीची निर्णय जाहीर करण्यात आलेला आहे. मात्र शेतकऱ्यांमागे नैसर्गिक आपत्ती, बँकांसह सावकारांचे कर्ज, वसुलीसाठी तगादा, मुलिचे लग्न, आजारीपण यासह अनेक विवंचना आहेत व यामध्ये शेतकऱ्यांच्या संघर्षावर नैराश्य मात करीत असल्याने शेतकरी आत्महत्यांच्या प्रकारात वाढ होत आहे.

शासनाने शेतकरी आत्महत्याप्रवण १४ जिल्ह्यांसाठी अनेक योजना राबविल्या मात्र गरजू शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळालेला नाही. त्यानंतर कृषी विभागाने राबविलेल्या महाडीबीटीमध्ये 'ड्रा' प्रक्रियेत नंबर लागलेल्या शेतकऱ्यांनाच योजनेचा लाभ मिळाला, या योजनांमध्येही गरजू शेतकरी लाभापासून वंचित राहिले आहे. शिवाय शेतकरी आत्महत्याप्रवण जिल्ह्यांसाठी असलेले स्व. वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबी मिशनदेखील यावर नियंत्रण मिळविण्यात अपयशी ठरले आहे.

# महिला नगरसेविकेऐवजी पतीकडून कामकाज

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२ अंजनगावसुर्जी**
अंजनगावसुर्जी येथे जनतेतून निवडून आलेल्या महिला नगरसेविकेच्या ऐवजी त्यांच्या पतीकडून नगरपरिषदेच्या कामकाजात हस्तक्षेप होत असल्याची गंभीर तक्रार करण्यात आली आहे. बुधवारा, सुर्जी येथील रहिवासी अ. वसीम अ. मजीद यांनी याबाबत मुख्याधिकाऱ्यांना लेखी निवेदन दिले आहे. निवेदनात अर्जदार वसीम मजीद यांनी म्हटले आहे की, नगरपरिषद येथे महिला नगरसेविका जनतेद्वारे निवडून आलेल्या असताना प्रत्यक्षात त्यांच्या ऐवजी त्यांचे नातेवाईक अथवा इतर पुरुष नातेवाईक नगरपरिषद कामकाजात सतत हस्तक्षेप करीत आहेत. निवडून न आलेल्या व्यक्तींनी नगरपरिषद कार्यालयात नगरसेवकांच्या खुर्चीवर बसणे, अधिकाऱ्यांवर दबाव टाकणे, जनहिताच्या कामात हस्तक्षेप करणे तसेच स्वतःला नगरसेवक असल्याप्रमाणे वागविणे, हे लोकशाही व्यवस्था व महिला आरक्षणाच्या उद्देशाच्या विरोधात असल्याचे निवेदनात नमूद केले आहे. नगरसेविकेच्या जागी नगरपरिषद मीटिंगमध्ये तसेच नगरसेवकांच्या कामकाजामध्ये त्यांचे पती हस्तक्षेप करीत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. सदर प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून निवडून न आलेल्या व्यक्तीचा नगरपरिषद कामकाजातील हस्तक्षेप तात्काळ बंद करण्यात यावा व दोषींवर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात यावी, अशी विनंती अ. वसीम अ. मजीद यांनी केली आहे.

# अन्न व औषधी प्रशासनात मनुष्यबळाची वानवा

# अमरावती विभागातील रिक्त पदे भरणार केव्हा?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती** राज्यात अन्न व औषध प्रशासन विभागाच्या कारभारात शिस्त, पारदर्शकता आणि कार्यक्षमतेवर तुकाराम मुंढे यांच्याकडून भर दिला जात असला, तरी अमरावती विभागात मोठ्या प्रमाणावर रिक्त पदांमुळे अन्न भेसळ, औषध तपासणी आणि अंमलबजावणीच्या कामावर परिणाम होत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे कारवाई करणार कोण आणि भेसळ तपासणार कोण?, असा प्रश्न उपस्थित होत





आहे.अमरावती विभागात औषध निरीक्षकांची तब्बल ११ पदे रिक्त असून, सहायक आयुक्तांची ३ पदेही रिक्त आहेत. या पदांवर नियुक्त्या न झाल्याने उपलब्ध अधिकाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा ताण वाढला आहे. सण-उत्सवांच्या काळात अन्नपदार्थामध्ये होणारी भेसळ, औषध विक्रीतील अनियमितता, तसेच विविध आस्थापनांची तपासणी करण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ नसल्याची बाब समोर येत आहे. अन्न भेसळ रोखण्यासाठी नियमित नमुना संकलन, तपासणी, छापे आणि न्यायालयीन कार्यवाही आवश्यक असते. मात्र, रिक्त पदांमुळे या कारवायांचा वेग मंदावल्याची चर्चा विभागात आहे.एकाच अधिकाऱ्याला अनेक जिल्ह्यांचा कारभार सांभाळावा लागत असल्याने तपासणी मोहिमा, नमुना संकलन आणि कारवाईच्या प्रक्रियेवर मर्यादा येत आहेत. नागरिकांच्या आरोग्याशी थेट संबंधित असलेल्या या विभागात मोठ्या प्रमाणावर रिक्त पदे असणे चिंतेची बाब मानली जात आहे. भेसळयुक्त अन्नपदार्थ, बनावट औषधे आणि नियमभंग करणाऱ्या व्यावसायिकांवर प्रभावी कारवाईसाठी सक्षम यंत्रणा आवश्यक आहे. मात्र, मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे प्रशासनाची कार्यक्षमता मर्यादित होत असल्याचे चित्र आहे.

### औषधी प्रशासनातील अमरावती विभागातील पदांची माहिती

| पदाचे नाव | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| सह आयुक्त | ०१ | ० | ०१ |
| सहायक आयुक्त | ०५ | ०२ | ०३ |
| औषधी निरीक्षक | १२ | ०१ | ११ |

# विहिरीत पडलेल्या महिलेला अग्निशमन दलाकडून जीवदान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती,**

महाजनपुरा भातकुली रोडवरील पंचीबाई यांच्या वाडीत विहिरीत पडलेल्या एका महिलेचा अमरावती महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाने तत्परतेने बचाव करून तिचा जीव वाचविला. ही घटना शुक्रवारी (१२ जून) सकाळी घडली.अमरावती पोलीस कंट्रोल रूमकडून सकाळी ६.४५ वाजता अग्निशमन मुख्यालयाला एका महिला विहिरीत पडल्याची माहिती मिळाली. अग्निशमन अधीक्षक अजय पंधरे यांच्या आदेशानुसार फायर लॉरी (एमएच २७ बीएक्स ७८०३) तातडीने घटनास्थळी रवाना करण्यात आली. वाहन चालक निलेश आजणे, संजय चव्हाण तसेच फायरमन मनीष उताणे,



राहुल घोडे, अमोल निस्ताने व मोहम्मद ताहीर यांनी अवघ्या काही मिनिटांत घटनास्थळी पोहोचून बचावकार्य सुरू केले.विहिरीभोवती मोठी गर्दी जमलेली असताना जवानांनी रोप लॅडरच्या साहाय्याने विहिरीत उतरून महिलेच्या कमरेला दोर बांधला आणि सुरक्षितपणे तिला वर काढले. बचाव करण्यात आलेल्या महिलेचे नाव आशा सुरेश दुधे (वय ५८, रा. कांचन विहार, गडगडेश्वर मंदिर परिसर) असे आहे.बचावानंतर त्यांना पुढील वैद्यकीय उपचारासाठी शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले. या घटनेत कोणतीही जीवितहानी अथवा गंभीर दुखापत झाली नसून पुढील तपास पोलीस करत आहेत. अग्निशमन दलाच्या तत्परतेचे नागरिकांनी कौतुक केले.

# युरिया खतासाठी दर्यापूरात शेतकऱ्यांच्या रांगा; भर उन्हात तासन्तास प्रतीक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२दर्यापूर,** खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतीच्या कामांना वेग आला असताना युरिया खताच्या खरेदीसाठी दर्यापूर येथील सहकारी शेतकरी सोसायटीसमोर शेतकऱ्यांच्या लांबलचक रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. खत उपलब्ध करून घेण्यासाठी परिसरातील अनेक गावांतील शेतकरी मोठ्या संख्येने सोसायटीत दाखल झाल्याने येथे गर्दी उसळली आहे.खरीप हंगामासाठी पेरणीपूर्व तयारी सुरू असून पिकांच्या वाढीसाठी आवश्यक असलेल्या युरिया खताची मागणी वाढली आहे. मात्र जिल्ह्यात पुरेसा साठा उपलब्ध नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. त्यामुळे उपलब्ध खत खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांना सकाळपासूनच रांगेत उभे राहावे लागत आहे. अनेक शेतकरी लवकर क्रमांक लागावा म्हणून पहाटेपासूनच सोसायटी परिसरात दाखल होत असल्याचे दिसून आले.दरम्यान, अमरावती जिल्ह्यात सध्या तापमानाचा पारा ४२ अंश सेल्सिअसच्या पुढे गेला आहे. अशा कडक उन्हात शेतकऱ्यांना तासन्तास उभे राहावे लागत असल्याने त्यांची मोठी गैरसोय होत आहे. विशेषतः ज्येष्ठ शेतकरी आणि महिलांना उष्णतेचा अधिक त्रास सहन करावा लागत असल्याचे



सांगण्यात आले. उन्हापासून बचावासाठी सावलीची व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सुविधा किंवा बसण्याची सोय उपलब्ध नसल्याचा आरोपही शेतकऱ्यांनी केला.यावेळी काही शेतकऱ्यांनी प्रशासन आणि कृषी विभागाकडे नाराजी व्यक्त करत खताचा पुरेसा साठा उपलब्ध करून देण्याची मागणी केली. खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच खतासाठी अशी धावपळ करावी लागत असल्याने शेतकरी चिंतेत आहेत. वेळेवर खत मिळाले नाही तर पिकांच्या व्यवस्थापनावर परिणाम होण्याची भीतीही त्यांनी व्यक्त केली.दर्यापूर परिसरातील शेतकऱ्यांनी जिल्हा प्रशासनाने युरिया खताचा पुरेसा पुरवठा करावा तसेच खत वितरण केंद्रांवर आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी केली आहे. खरीप हंगाम सुरळीत पार पाडण्यासाठी खताचा नियमित आणि पुरेसा साठा उपलब्ध होणे अत्यावश्यक असल्याचे शेतकरी सांगत आहेत.

# क्षुल्लक कारणावरून गेटमनला मारहाण

## अमरावती-जबलपुर एक्स्प्रेस ४० मिनिटे रोखली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२वरुड-** वरुड रोडवरील रेल्वे क्रॉसिंगचे गेट उघडण्याच्या क्षुल्लक कारणावरून एका पोलीस उपनिरीक्षकाने गेटमनला बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या खळबळजनक प्रकारामुळे गुरुवारी अमरावती-जबलपूर एक्स्प्रेस (१२१५९) पांढुर्णा स्थानकावर सुमारे ४० मिनिटे रखडली होती. या घटनेमुळे रेल्वे वर्तुळात आणि प्रवाशांमध्ये संताप व्यक्त होत आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, वरुड रोडवरील रेल्वे क्रॉसिंगवर ड्युटीवर असलेल्या गेटमनवर एका पोलीस उपनिरीक्षकाने केवळ गेट लवकर उघडले नाही म्हणून राग काढला. संतप्त झालेल्या या पोलीस अधिकाऱ्याने गेटमनला मारहाण करण्यास सुरुवात केली. पोलिसाच्या तावडीतून सुटण्यासाठी भयभीत झालेला गेटमन तेथून थेट पळत सुटला आणि क्रॉसिंगपासून तब्बल १ किलोमीटर अंतरावर असलेल्या पांढुर्णा स्थानक व्यवस्थापकाच्या कक्षामध्ये पोहोचला.

हा हायव्होल्टेज ड्रामा एवढ्यावरच थांबला नाही. तो पोलीस उपनिरीक्षक गेटमनचा पाठलाग करत थेट स्थानक व्यवस्थापकाच्या कक्षामध्ये घुसला. तिथे स्टेशन प्रशासनाच्या समोरच त्याने गेटमनला पुन्हा धमकावल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. या गंभीर प्रकारामुळे स्थानक परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

या संपूर्ण गोंधळात रेल्वे सिग्नलिंग आणि सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाल्याने, पांढुर्णा स्थानकावर आलेली १२१५९ अमरावती-जबलपूर एक्स्प्रेस पुढे रवाना होऊ शकली नाही. अखेर रेल्वे प्रशासन आणि सुरक्षा दलाच्या मध्यस्थीनंतर, परिस्थिती नियंत्रणात आली. तब्बल ४० मिनिटांच्या विलंबाने ही गाडी पुढील प्रवासासाठी रवाना करण्यात आली.

कायद्याचे रक्षकच जर अशा प्रकारे रेल्वे कर्मचाऱ्यांवर हात उचलून रेल्वे सेवेचा बोजवारा उडवणार असतील, तर सामान्य जनतेच्या सुरक्षेचे काय? असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे. संबंधित दोषी पोलीस उपनिरीक्षकावर कडक कारवाई करण्याची मागणी रेल्वे कर्मचाऱ्यांकडून केली जात आहे.

# जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांचा तिवसा तालुक्यात 'गावमुक्काम'

## नागरिकांशी साधला थेट संवाद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२ अमरावती,** जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी नुकताच तिवसा तालुक्याचा दौरा केला. या दौऱ्यादरम्यान त्यांनी मौजे मोझरी येथे 'गावभेट व गावमुक्काम' केला, ज्यामुळे 'प्रशासन आपल्या दारी' ही संकल्पना प्रत्यक्षात साकार झाल्याचे पाहायला मिळाले.

दौऱ्याच्या पहिल्या दिवशी, ११ जून रोजी जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी मौजे शिवणगाव येथील कृषी विभागांतर्गत प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेतील प्रकल्पांना भेटी दिल्या. यामध्ये निलेश कुरवाडे यांच्या 'अर्क आईस्क्रीम युनिट ' आणि स्वाती डोळस यांच्या 'हळद पावडर प्रकल्पा'ची पाहणी करून त्यांच्याशी सविस्तर चर्चा केली. तसेच शिवणगाव येथील नागरिकांच्या समस्या ऐकून त्या तात्काळ निकाली काढण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

यानंतर त्यांनी तिवसा येथील नव्याने उभारण्यात आलेल्या शासकीय धान्य गोदामाची पाहणी करून डॉ. पंजाबराव देशमुख खरेदी-विक्री संघाच्या ज्वारी खरेदीचा आढावा घेतला.

जिल्हाधिकाऱ्यांनी तिवसा तहसील कार्यालयात विविध विभागांची आढावा बैठक घेऊन शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि नागरिकांच्या तक्रारींवर गतिमान कारवाई करण्याचे निर्देश दिले. गुरुदेवनगर येथे राष्ट्रसंत तुकडोजी



महाराज यांच्या समाधीचे दर्शन घेऊन सामूहिक प्रार्थनेला उपस्थित राहिले. तसेच पद्मश्री पुरस्कार प्राप्त जनार्धन बोथे गुरुजी यांचा शाल व श्रीफळ देऊन प्रशासनातर्फे सत्कार केला. सायंकाळी जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी मोझरी येथील झेंडा चौकात ग्रामस्थांशी व शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला. त्यांच्या समस्या जाणून घेत अनेक प्रश्नांवर जागेवरच निर्णय घेतले व रात्री मोझरी गावातच मुक्काम केला.

दुसऱ्या दिवशी, सकाळी त्यांनी मोझरी विकास आराखड्यांतर्गत सुरू असलेल्या विविध इमारतींच्या बांधकामांची पाहणी केली. यानंतर तिवसा नगर पंचायतीच्या घनकचरा व्यवस्थापन डेपोला भेट देऊन मुख्याधिकाऱ्यांकडून आढावा घेतला. उपजिल्हा रुग्णालय तिवसा येथील स्वच्छता, कर्मचारी उपलब्धता व आरोग्य सुविधांची तपासणी करून त्यांनी आवश्यक सूचना केल्या. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत नूतनीकरण करण्यात आलेल्या ग्राम महसूल अधिकारी कार्यालयाची पाहणी करून त्यांनी दप्तराच्या कामकाजाचाही आढावा घेतला.

यावेळी उपविभागीय अधिकारी दादासाहेब दराडे, तहसीलदार मयूर कळसे, गट विकास अधिकारी अभिषेक कासोदे यांच्यासह सर्व प्रमुख विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. जिल्हाधिकाऱ्यांच्या या संवेदनशील आणि लोकाभिमुख दौऱ्यामुळे तिवसा तालुक्यातील नागरिकांमध्ये प्रशासनाप्रती अत्यंत सकारात्मक व विश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# मोर्शी तालुक्यात पाणंद व शिवरस्ते अतिक्रमणमुक्त

## महसूल प्रशासनाची मोठी कारवाई, अनेक अडथळ्यांवर मात

*विदर्भ प्रजासत्ताक*
*दि.१२मोर्शी*

*शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न असलेल्या शेतपाणंद व शिवरस्त्यांवरील अतिक्रमण हटविण्यासाठी मोर्शी तालुक्यात महसूल प्रशासनाने राबविलेली 'धडक मोहीम' यशस्वी ठरली आहे. या मोहिमेत तब्बल ३७ हून अधिक शेतपाणंद व शिवरस्ते अतिक्रमणमुक्त करण्यात आले आहेत. तहसीलदार सागर ढवळे व त्यांच्या टीमने प्रत्येक पाणंद रस्त्याची पाहणी करून शेतकऱ्यांचे समाधान करून रस्ते मोकळे केले. शेतकऱ्यांना त्यांच्या शेतापर्यंत सहज पोहोचता यावे, शेतीमालाची वाहतूक सुलभ व्हावी आणि वर्षानुवर्षे बंद असलेले रस्ते पुन्हा सुरू व्हावेत, या उद्देशाने प्रशासनाने विशेष नियोजन करून मोहीम हाती घेतली. अनेक ठिकाणी स्थानिक वाद, राजकीय दबाव, विरोध आणि तणावपूर्ण परिस्थितीचा सामना करीत प्रशासनाने ही कारवाई पूर्ण केली. मोहीम यशस्वी करण्यासाठी तहसीलदार सागर ढवळे, गटविकास अधिकारी मडगूल, रोजगार हमी योजना विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलिस प्रशासन, भूमी अभिलेख विभाग, मंडळ अधिकारी, तलाठी, महसूल सेवक आणि रोहयो कर्मचाऱ्यांनी संयुक्तपणे काम केले. फेब्रुवारी महिन्यात सुमारे ३७ गावांची प्रत्यक्ष पाहणी करून रस्त्यांची माहिती संकलित करण्यात आली. त्यानंतर संबंधित शेतकऱ्यांशी संवाद साधून आणि आवश्यक ती मोजणी करून अतिक्रमण हटविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. अनेक वर्षांपासून बंद असलेले रस्ते खुले करण्यात आले. यामध्ये खेड-विलास ते गोवळापूर, खानापूर-बेलखेडा, शिरखेड-निंभी, जेतापूर शिवार, बोडणा, पाळा, आष्टी, कोळविहीर, चिखलसावंगी, नया वठोडा, हिवरखेड, शिरखेड-सालेपूर आदी भागांतील महत्त्वाच्या रस्त्यांचा समावेश आहे. तसेच सिंभोरा, काटपूर, गणेशपूर, महमदपूर-कोपरा, पाळा, लाडकी, मोळवण-बोपाळवाडी यांसारख्या गावांतील रस्तेही अतिक्रमणमुक्त करण्यात आले. ही मोहीम राबविताना प्रशासनास अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी कठोर भूमिका घेत संबंधित अधिकाऱ्यांना सर्व रस्ते मोकळे करण्याचे स्पष्ट निर्देश दिले. या मोहिमेमुळे अनेक वर्षांपासून बंद असलेले रस्ते सुरू झाल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. शेती मशागतीची यंत्रे, बियाणे, खते आणि शेतीमाल वाहतुकीसाठी आता सुलभ मार्ग उपलब्ध झाला आहे.*



# घोडदेव सिंचन प्रकल्प ठरला संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी वरदान!

## माजी कृषी मंत्री हर्षवर्धन देशमुख यांची दूरदृष्टी !

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२मोर्शी**

माजी कृषी मंत्री तथा श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्या दूरदृष्टीमुळे ड्राय झोन असलेल्या मोर्शी तालुक्यातील घोडदेव सिंचन प्रकल्पामुळे परिसरातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून हा प्रकल्प आज हजारो हेक्टर क्षेत्राच्या सिंचनाचा आधार बनला आहे. घोडदेव, दापोरी, डोंगर यावली, हिवरखेड तसेच परिसरातील अनेक गावांतील शेतकऱ्यांच्या शेतीला या प्रकल्पामुळे बारमाही पाण्याची उपलब्धता निर्माण झाली आहे. परिणामी संत्रा उत्पादनात लक्षणीय वाढ होऊन शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीला चालना मिळाली आहे. मोर्शी तालुक्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीमध्ये महत्त्वाचा वाटा उचलणारा घोडदेव सिंचन प्रकल्प आज हजारो शेतकऱ्यांसाठी जीवनदायी ठरत आहे. दूरदृष्टी, प्रभावी नियोजन



आणि शेतकरी हिताला प्राधान्य देणारे नेतृत्व म्हणून ओळख असलेल्या माजी कृषी मंत्री हर्षवर्धनजी देशमुख यांच्या प्रयत्नांमुळे हा प्रकल्प साकार झाला असून त्याचा लाभ आज घोडदेव, डोंगर यावली, हिवरखेड, दापोरी, सालबर्डी तसेच परिसरातील अनेक गावांतील शेतकऱ्यांना होत आहे.पूर्वी या भागातील शेती मोठ्या प्रमाणात पावसावर अवलंबून होती. पावसाच्या अनिश्चिततेमुळे संत्रा बागांची वाढ, उत्पादन आणि गुणवत्तेवर परिणाम होत होते. अनेक शेतकऱ्यांना पाण्याअभावी मोठ्या आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत होते. मात्र घोडदेव सिंचन प्रकल्पामुळे सिंचनासाठी मुबलक पाणी उपलब्ध झाले आणि परिसरातील शेतीला नवसंजीवनी मिळाली.या प्रकल्पामुळे हजारो हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले असून मोर्शी तालुक्यात संत्रा लागवडीचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढले आहे. नियमित पाणीपुरवठ्यामुळे संत्रा बागांची उत्पादकता वाढली, फळांची गुणवत्ता सुधारली आणि शेतकऱ्यांचे उत्पन्नही वाढले आहे. अनेक शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून बागायती शेतीकडे वाटचाल केली असून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळाली आहे.शेतकऱ्यांच्या विकासासाठी केवळ घोषणा न करता प्रत्यक्षात विकासकामे उभी करण्याची क्षमता हर्षवर्धनजी देशमुख यांनी दाखवून दिली आहे. घोडदेव सिंचन प्रकल्प हे त्यांच्या दूरदृष्टीचे आणि शेतकरी हिताच्या बांधिलकीचे जिवंत उदाहरण मानले जात आहे. या प्रकल्पामुळे केवळ पाण्याची उपलब्धता वाढली नाही, तर हजारो कुटुंबांच्या जीवनमानातही सकारात्मक बदल घडून आला आहे.आज घोडदेव सिंचन प्रकल्पाकडे पाहताना परिसरातील शेतकरी कृतज्ञतेने सांगतात की, पाणी आले, हरितक्रांती आली आणि संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या आयुष्याला नवी दिशा मिळाली. मोर्शी तालुक्यातील कृषी विकासाचा हा महत्त्वाचा टप्पा मानला जात असून भविष्यातही या प्रकल्पाचा लाभ अनेक पिढ्यांना मिळत राहणार आहे.दूरदृष्टी असलेले नेतृत्व, शाश्वत सिंचन व्यवस्था आणि समृद्ध शेतकरी हेच घोडदेव सिंचन प्रकल्पाचे खरे यश आहे.

> घोडदेव सिंचन प्रकल्पामुळे आमच्या भागातील शेतीला नवे जीवन मिळाले आहे. पूर्वी पावसाच्या भरोशावर शेती करावी लागत होती. पाण्याअभावी संत्रा बागा टिकवणे कठीण होत होते. मात्र आज सिंचनासाठी नियमित पाणी उपलब्ध झाल्याने संत्रा उत्पादनात मोठी वाढ झाली आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले असून आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत झाली आहे. हा प्रकल्प माजी कृषी मंत्री हर्षवर्धनजी देशमुख यांच्या दूरदृष्टीचे उत्तम उदाहरण आहे. – **रुपेश प्रकाशराव वाळके**
> अध्यक्ष, राष्ट्रवादी युवक काँग्रेस पक्ष, मोर्शी तालुका–